महाराष्ट्र शासन
वन विभाग

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे कार्यालय

(बि.एस.एन.एल. लक्ष्मी संचार इमारत, कस्तुरचंद पार्क समोर, नागपूर ४४० ००१.)
(Land Line No - ०७१२-२५६४५६९, Email-id : ccftnagpur@mahaforest.gov.in)

जा.क्र.कक्ष-२/आस्था-ब/वैप्रदे/प्रक्र.६४२(१५-१६)/२०२२-२३/ 741 नागपूर, दिनांक : 30 मे,२०२२

**ई-मेलव्दारे**

**विषय :** वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूरी करणेरांदर्भात मार्गदर्शक सूचना.

**संदर्भ :** १. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३, दि.१९ मार्च,२००५

२. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: वैखप्र-२०१८/प्र.क्र.४८८/२०१८/राकावि-२, दि.०६ जून,२०१९

३. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: वैखप्र-२०२०/प्र.क्र.६६/राकावि-२, दि.१७ डिसेंबर,२०२०

संदर्भ क्र.१ व ३ येथील शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजूरीबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. उक्त शासन निर्णयामध्ये समाविष्ठ २८ आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती खालील नमुद केल्यानुसार अनुज्ञेय ठरते.

**१) औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपुर्ती :-**

*वेतनगटानुसार औषधोपचारावरील खर्चाच्या प्रतिपुर्तीची अनुज्ञेय रक्कम प्रस्तुत शासन निर्णयातील तक्ता "अ" मध्ये नमुद केले आहे. त्यात सुधारणा करण्यात येऊन आता वेतनश्रेणीचे वर्गीकरण न करता औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% रक्कम सरसकट अनुज्ञेय राहील.*

**२) खाजगी रुग्णालयातील वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती :-**

प्रस्तुत शासन निर्णयातील तक्ता "ब" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती करावयाचा सुधारित दर |
|---|---|---|
| १. | जनरल वार्ड (सर्वसमान्य कक्ष) | प्रत्यक्ष खर्चाच्या ९५% अनुज्ञेय |
| २. | जनरल वार्ड (सर्वसामान्य कक्षाच्या बाजुचा बाथरुम नसलेला कक्ष) | प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% अनुज्ञेय |
| ३. | बाथरुमसह स्वतंत्र कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ७५% अनुज्ञेय |
| ४. | बाथरुमसह डबल बेडेड कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ७५% अनुज्ञेय |

| अ. क्र. | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती करावयाचा सुधारित दर |
|---|---|---|
| ५. | बाथरुमसह वातानुकुलीत कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ७५% अनुज्ञेय |
| ६. | अतिदक्षता कक्ष (ICU) | १००% |

२. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजूरीबाबत प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारांत सुधारणा करण्यात आलेली असून त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| सक्षम प्राधिकारी | सुधारित अधिकार |
|---|---|
| मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुख | रुपये-३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) वरील प्रकरणे. |
| विभाग प्रमुख | रुपये-२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) वरील परंतू रुपये-३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) पर्यंतची प्रकरणे. |
| प्रादेशिक विभाग प्रमुख | रुपये-२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) पर्यंतची प्रकरणे. |

३. उपरोक्त परिच्छेद क्र.१ व २ मध्ये नमुद तरतूदींचे अधिन राहून नागपूर वनवृत्ताच्या अधिनस्त विभागीय/क्षेत्रिय कार्यालयातील वर्ग-१ ते वर्ग-४ च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची विभागीय कार्यालयाचे अधिकारक्षेत्राबाहेरील रु.२,००,०००/- वरील व रु.३,००,०००/- पर्यंतची प्रकरणे मंजूरीस्तव या कार्यालयाकडे सादर करण्यात येतात. तसेच, रु.३,००,०००/- वरील प्रकरणे मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुख यांचेकडे मंजूरीस्तव सादर करणे संबंधाने या कार्यालयास प्राप्त होतात. विभागीय स्तरावरुन प्राप्त वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकाचे अवलोकन केले असता, त्यांचेस्तरावर वैद्यकीय देयकाची परिगणना उक्त परिच्छेद क्र.१ मध्ये नमुद केल्यानुसार सरसकट करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तथापि, सदर देयकातील कोण कोणत्या रक्कमा ना-देय आहेत याबाबतची शहानिशा करण्यात येत नाही. यावरुन विभागीय कार्यालयाचे अधिकारक्षेत्रातील रु.२,००,०००/- पर्यंतच्या प्रकरणात सध्दा दि.१९.०३.२००५ चे शासन निर्णयातील तरतूदीनुसार सरसकट परिगणना करुन देयक मंजूर होत असल्याचे दिसून येते. परिणामी, बहूतांश वैद्यकीय देयक ना-देय रक्कमांची वजाती न करताच मंजूर करण्यात येत असल्याने त्यात अतिप्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दि.२८.०६.२०२१ अन्वये वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकातील नादेय बाबींची (Non Admissible Items) यादी जारी करुन त्यांचे अधिनस्त सर्व कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर यादीची प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता सोबत पाठविण्यात येत आहे.

५. निम्न स्वाक्षरीकर्ते यांचे असेही निदर्शनास आले आहे की, विभागस्तरावरुन प्राप्त रु.३,००,०००/- वरील वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक शासन मान्यतेकरीता या कार्यालयाचे स्तरावरुन वरिष्ठांकडे सादर करण्यात येतात. विभागास्तरावरुन वैद्यकीय देयकाची परिगणना करुन अनुज्ञेय रक्कम अहवालामध्ये नमुद करण्यात येते. तथापि, शासनाकडून मंजूरी प्राप्त अनुज्ञेय रक्कम व विभागस्तरावर परिगणना करण्यात आलेली रक्कम यात मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. यावरुन विभागस्तरावरील परिगणना योग्य प्रकारे होत नसल्याची बाब स्पष्ट होत आहे.

६. मंत्रालयीन स्तरावरुन मंजूरी प्राप्त देयकांचे अवलोकन केले असता, त्यात खालील बाबींवरील अनुज्ञेय रक्कमांमध्ये साम्य दिसून येत आहे.

| अ.क्र. | बाबी | अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|
| १. | औषधोपचार खर्च कमाल मर्यादा | एकूण औषधोपचार खर्चाच्या ९०% **(तत्पुर्वी देयकामध्ये समाविष्ठ असलेल्या नादेय बाबींची वजाती करण्यात यावी)** |
| २. | **रुग्णालय वास्तव्य खर्च**<br>आय.सी.यू.<br>जनरल वॉर्ड | <br>रु.२०००/- (प्रती दिन)<br>रु.१०००/- (प्रती दिन) |
| ३. | डॉक्टर व्हिजीट चार्जेस | रु.५००/- (प्रती व्हिजीट) |
| ४. | वेन्टीलेटर चार्जेस | रु.३०००/- (प्रति दिन) |
| ५. | ऑक्सीजन चार्जेस | रु.५००/- (प्रति दिन) |
| ६. | रजिट्रेशन चार्जेस / नर्सिंग चार्जेस / आरएमओ चार्जेस | अनुज्ञेय नसलेला खर्च. |

७. उक्त परिच्छेदात नमुद अनुज्ञेय रक्कमा या शासन स्तरावरुन निश्चित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, शासन स्तरावरुन मंजूर देयकाचे ज्ञापनामध्ये एकूण औषधोपचार खर्चाच्या ९०% रक्मम अनुज्ञेय असली तरी तत्पुर्वी देयकामध्ये समाविष्ठ असलेल्या, नादेय असलेल्या बाबींची वजाती करण्यात यावी, असे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

८. उपरोक्त बाबींचा विचार करता, उपवनसंरक्षक (सर्व) यांना निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी त्यांचे अधिकारक्षेत्रातील वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक मंजूर करतांना परिच्छेद क्र.६ मधील तक्त्यात दर्शविल्यानुसार परिगणना करुनच देयक मंजूर करावे. वैद्यकीय देयक मंजूर करतांना कोणालाही अतिप्रदान होणार नाही, याबाबत सर्वोतोपरी दक्षता घेण्यात यावी. तसेच गेल्या तीन वर्षात या तरतूदींचे उल्लंघन झाले आहे किंवा कसे? याबाबतचा अहवाल देखील निम्न स्वाक्षरीकर्ते यांचेकडे प्रमाणपत्रासह सादर करावा.

(रंगनाथ नाईकडे)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
नागपूर वनवृत्त, नागपूर.

प्रति,
उपवनसंरक्षक,
नागपूर/वर्धा/भंडारा/गोंदिया.

**प्रतिलिपी - (माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव)**

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा., नागपूर.
२. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, नागपूर.
३. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
४. उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
५. उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र, गोंदिया.
६. उपसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र, साकोली.
७. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, नागपूर/वर्धा/भंडारा/गोंदिया.